# श्रमिक मुक्ती दलाचे आवाहन



## मतदार बंधू-भगिनींनो,

पी. के. पाटील यांना भुईसपाट करा

विधान सभेच्या निवडणुका जाहिर झाल्या आहेत. २७ फेब्रु. ९० रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीच्या मैदानात या वेळी इंदिरा कॉंग्रेस, महाराष्ट्र इंदिरा कॉंग्रेस पुरोगामी लोकशाही आघाडी व जातीयवादी भाजप-शिवसेना युती अशी चौरंगी लढत आहे. पुरोगामी लोकशाही आघाडी मध्ये जनता दल, भारतीय कम्युनिष्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष, सत्य शोधक कम्युनिष्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना, कामगार आघाडी इत्यादी डाव्या व पुरोगामी पक्ष संघटनांचा समावेष आहे.

भांडवली जातीयवादी व पुरुष प्रधान चौकटीतील निवडणुकीतून कष्टकरी दलित आदिवासी व स्त्रीया यांच्या जीवनात मुलभूत फरक पडणे अशक्य आहे हे आपणास स्पष्ट आहे तरीपण निवडून येणारे सत्ताधारी जेव्हा राज्य कारभार हातात घेतात त्या वेळी त्याचा थोडाफार का असेना कष्टकरी स्त्री-पुरुषांच्या जीवनावर परीणाम होत असतोच.

जंगले तुटतच आहेत, नद्या आटत आहेत, दुष्काळाचे फेरे वाढतच आहेत, रासायनिक खताशिवाय शेती पीकत नाही. कष्टकरी शेतकऱ्याला जगणे कठीण झाले आहे बेकारी वाढतच आहे. शेतमजुराला काम नाही तरुणांना रोजगार नाही. गरीबी भ्रष्टाचार वाढतच आहेत आदिवासी स्त्रीयांवरील अत्याचार वाढतच आहेत अशा वेळी फुले आणि आंबेडकरांच्या महाष्ट्रारात भाजप शिवसेने सारखे जातीयवादी हुकुमशाही प्रवृत्तीचे पक्ष धर्माच्या नावावर सत्तेवर येण्याची स्वप्ने बघताहेत त्यांना पाडणे आणि परत त्यांनी डोके वर काढू नये अशी शक्ती उभी करणे आपले पहिलें काम.

सत्तारुढ कॉंग्रेसचे राजकारण हे भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे. गरीब कष्टकरीच्या विरोधातले आहे. कुठल्याही अर्थाने कॉंग्रेस सत्तेवर येण्याच्या लायकीचे नाही.

अशा परिस्थितात लाल बावटा हाच खरा पर्याय होऊ शकला असता पण महाराष्ट्रात सर्वत्र लाल बावट्याचे उमेदवार नाहीत. लाल बावट्याने पाठींबा दिलेल्या पुलोद आघाडीस विजयी करायला हवे शिरपूर मधें दलीत आदिवासी कष्टकऱ्यांच्या सोबत काम करणाऱ्या **भीमराव म्हसके यांना विजयी करा.** खरे तर आघाडीने त्यांना पाठींबा द्यायला हवा होता.

कष्टकऱ्यांच्या चळवळीसाठी ज्यांनी आपले जीवन झोकुन दिलेले तळोदा विधान सभा मतदार संघातील पुलोआचे, माकपचे अधिकृत उमेदवार **कॉ. जयसिंग माळी** व साक्री विधान सभा मतदार संघातील पुलोआचे सकपचे अधिकृत उमेदवार **कॉ. डोंगर बागुल** तसेच धुळें मतदार संघातील पुलोआचे अधिकृत उमेदवार **डॉ. रा. भ. चौधरी** यांना प्रचंड मताने विजयी करा. **मात्र शहादा दोंडाईचा मतदार संघातील पी. के. पाटील यांना पाडा म्हणून आम्ही दलित आदिवासी कष्टकरी बांधवांना नम्र विनंती करीत आहोत.** या भागातले कष्टकरी आदिवासी पुरुषोत्तम सेना शेल्टी हत्याकांड विसरु शकणार नाहीत भाजप, शिवसेना सारख्या जातीयवादी शक्तींशी एकजुट करु पाहणाऱ्या जातीयवादी पी. के. पाटलाला पु. लो. आघाडीने तिकीट द्यायला नको होते. वर्ग संघर्षाच्या लढाईत कष्टकऱ्यांच्या विरोधात राजकारण करणाऱ्या पी. के. पाटलाला पाडलेच पाहिजे.

अक्राणी विधान सभा मतदार संघातील पुलोदचे जनता दलाचे अधिकृत उमेदवार **ॲड. के. सी. पाडवी** या आदिवासी तरुणाची उमेदवारी पाहून त्यांना निवडून द्यावे असे आवाहन श्रमिक मुक्तीदल (धुळे विभाग) करीत आहे.

**सबके दिल में अंबर है!** **लाल बावटे की जय!**

आपले,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बाहुद सोनवणे, | धनाजी गुरव, | चंद्रसिंग बरडे, | पानसिंग पवार, | इंदास निकुंभ, | विठ्ठल पटेल, |
| ठगीबाई वसावे, | हिरकणा सोनवणे, | इंदूबाई वसावे, | सतीश पवार, | रुपसिंग सेवाळे, | सुकलाल खरडे |
| परशुराम चौधरी, | कृष्णा ठाकरे, | मन्साराम पवार, | रतीलाल चव्हाण, | सुक्राम माळी, | रुखा पवार, |
| | बनसिंग पवार, | रायसिंग ठाकरे, | विमलबाई ठाकरे | नारसिंग खर्डे | |

श्रमिक मुक्ती दल ( धुळे विभाग )